निखिल गौतम बागडे हे एक उदयोन्मुख आणि बहुआयामी मराठी साहित्यप्रेमी शिक्षक, संशोधक व लेखक आहेत. सध्या ते डी. जी. रुपारेल महाविद्यालयात साहाय्यक प्राध्यापक पदावर कार्यरत आहेत. त्यांनी मराठी साहित्य विषयात रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालयातून बी.ए. पदवी (८९.२३%) आणि मुंबई विद्यापीठातून एम.ए. (७०%) प्रथम क्रमांकासह संपादन केले आहे. सध्या ते 'मराठीतील निवडक नाटककारांच्या नाटकांतील नाट्यलेखन शैलीच्या स्थित्यंतराचा अभ्यास' या विषयावर पीएच.डी. करत आहेत.

ते भाषण व निवेदन कौशल्य, सर्जनशील लेखन, संपादन व संहिता लेखनात पारंगत असून विविध शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांत सक्रिय सहभाग घेत आले आहेत. त्यांचे काही प्रकाशित ग्रंथ व लेखनप्रकल्प असून त्यात  ‘माय मराठी, अभिजात मराठी’ हे पथनाट्य तसेच 'भाषिक कौशल्यांचे उपयोजन’ या पुस्तकाचा समावेश आहे. ‘नवरोझ बाग व्हाया बुद्ध वाडी’ ही त्यांची कादंबरी लवकरच प्रकाशित होणार आहे. त्यांना शिक्षण, साहित्य आणि सामाजिक कार्यामधील उल्लेखनीय योगदानासाठी पारितोषिके प्राप्त झाली आहेत.